## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१५ ( ) देशातील प्रश्नांकडे तरुणाई गांभिर्याने बघत नाही हा आक्षेप सपशेल खोटा ठरवत राजकारणापासून सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रापर्यंतच्या समस्यांचा तळ गाठण्याचा व त्यावरील उपाय सुचवण्याचा प्रयत्न आपल्या विविध कलाप्रकारांद्वारे सादर करुन खानदेशातील तरुणाईने युवारंग युवक महोत्सवाला एक वेगळीच उंची प्राप्त करुन दिली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यापीठस्तरीय युवक महोत्सवाचे गुरुवार दि. १४ फेब्रुवारी रोजी विद्यापीठाच्या प्रांगणात उद्घाटन झाले. प्रत्यक्ष स्पर्धा शुक्रवारी सकाळी ९ वाजता सहा रंगमंचांवर सुरु झाल्या. मिमिक्री, मुकनाटय, विडंबन आणि समुह लोकनृत्य, काव्य, वक्तृत्व, फाईन आर्ट याद्वारे विद्यार्थ्यांनी आपल्या सामाजिक संवेदना अत्यंत तरलपणे सादर केल्या. प्रत्येक कलाप्रकार सादर करताना तरुणांमध्ये उत्साह आणि कलेशी असलेला प्रामाणिकपणा व तडफ दिसून येत होती. उपस्थित रसिकांकडून कलांना उत्स्फुर्त दाद मिळत होती.

सकाळी ९.३० वाजता दीक्षांत सभागृहाच्या रंगमंचावर मिमिक्री या कलाप्रकाराने स्पर्धा सुरु झाली. नरेंद्र मोदी, नाना पाटेकर, अमिताभ, निळू फुले, गुलशन ग्रोवर, दादा कोंडके यांच्या हुबेहुब आवाजाद्वारे विविध सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न कलावंतांनी केला. त्यानंतर या मंचावर अत्यंत ताकदीची मुकनाटये सादर झाली. मोबाईलमुळे हरवलेल्या मानवी संवेदना, तृतीय पंथीयांवर होणार अन्याय, पर्यावरणाचा ऱ्हास, मानवी उत्क्रांती, जाती व्यवस्था यावर मुकनाटयाद्वारे प्रखर भाष्य करण्यात आले.त्यानंतर विडंबन नाटयाद्वारे विद्यार्थ्यांनी उपहास हा कशा पध्दतीने मांडता येतो याचा वास्तुपाठ घालून दिला.

अधिसभागृहात असलेल्या रंगमंच क्र.२ वर दिवसभर लोकगीत, सुगम गायन (भारतीय) व सुगम गायन (पाश्मिात्य), समुहगीत यामुळे वातावरण संगीतमय झाले होते. भारतीय लोकगीतात गवळण, गोंधळ, भारुड सादर करुन तरुणपिढीने आपली लोकसंगीताशी असलेली नाळ दाखवून दिली. सुगम गायन (पाश्चिमात्य) या कलाप्रकारात पाश्चिमात्य गायनातील नवे ट्रेंड सादर करुन परदेशी संगीताचा अभ्यास ही तरुणपिढी करत असल्याचा संदेश दिला. सुगम गायन (भारतीय) या कलाप्रकारात राजस सुकुमार मदनाचा पुतळा, सदाचार संकल्पना दे, चंद कलियोंके मुस्कुरानेसे, चंद कलीया चुनकर, सजल नयन नीत धार, अमृताहुनी गोड नाम तुझे देवा, कोई मिलता है तो अपना पता पुछता है, तुम्हारे सेहेरेका मौसम बडा सुहाना लगे, रंजिरा ही सही, अखेरचे येतील माझ्या हेच शब्द ओळी, जब तक मिले न ये तो कोई पुछता नही, खुद को बेहतर है सरानों मे भटकता देखू आदी गझल व अभंग सादर करण्यात आले.

डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम विद्यार्थी भवनातील रंगमंच क्र.३ वर शास्त्रीय गायनात विहाग, विलासतोडी, बागेश्री, अहिरभैरव, यमन, मारुबिहार, पुरीयाधन, पुरीया धनश्री, वृंदावनी सारंग, मिया मल्हार, मुलतानी राग सादर करुन रसिकांची वाहवा मिळवली. त्यानंतर या मंचावर शास्त्रीय वादन (सुरवाद्य) भूप, यमन कल्याण, अहिरभैरव, दरबारी, भुपाली, वृंदावन सागर, हंसध्वनी आदी राग सादर करण्यात आले. समुहगीत (पाश्चिमात्य), शास्त्रीय नृत्य आणि तालवाद्य हे कलाप्रकार सादर झाले.

सामाजिकशास्त्रे प्रशाळेच्या सभागृहातील रंगमंच क्र.४ वर शेतकरी, स्त्रीवाद, पर्यावरण, प्रेम, राष्ट्रभक्ती, यावर भाष्य करणाऱ्या ताकदीच्या कविता विद्यार्थ्यांनी सादर केल्या. बहिणाबाई चौधरींच्या सुप्रसिध्द कवितेच्या ` मन वढायं वढायं ` या कवितेच्या ओळी वक्तृत्व स्पर्धेसाठी विषय म्हणून देण्यात आल्या. मनाच्या संवेदना, मनाची घालमेल विद्यार्थ्यांनी आपल्या वक्तृत्वातून सादर केली. वादविवादासाठी जागतिकीकरणामुळे सामान्य माणूस समाधानी आहे / नाही हा विषय देण्यात आला होता. जागतिकीकरणाच्या परिणामाचे सकारात्मक व नकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांनी या विषयाद्वारे मांडले.

ग्रंथालयाचा परिसर दिवसभर फाईन आर्टच्या विविध कलाप्रकारांनी गजबजुन गेला होता. या ठिकाणी रंगमंच क्र. ५ व ६ होते. रांगोळीसाठी निसर्ग, युवारंग आणि पारंपारिक रांगोळी हे विषय देण्यात आले. यंगचित्रासाठी आजची राजकीय स्थिती व स्वच्छता हे विषय होते. तर मेहंदीसाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे मेहंदी काढण्यास सांगण्यात आले. चित्रकलेसाठी डिजिटल इंडिया, जलसंवर्धन आणि रस्ता सुरक्षितता हे विषय होते. मृदमुर्तीकला (क्ले मॉडेलिंग) या कलाप्रकारासाठी वात्सल्य, शेतकरी आणि सर्कस हे विषय होते. कोलाजसाठी वस्तुचित्र, निसर्ग चित्र आणि व्यक्तीचित्र हे विषय होते. इन्स्टॉलेशनसाठी पर्यावरण हा विषय देण्यात आला. याशिवाय स्पॉट पेटींग, कोलाज आणि फोटोग्राफी स्पर्धा देखील या ठिकाणी झाली. अत्यंत तन्मयतेने विद्यार्थ्यांनी या कलाप्रकारात भाग घेवून थक्क करायला लावतील अशी चित्रे, व्यंगचित्रे, क्ले मॉडेल, मेहंदी आणि रांगोळी काढली.

दिवसभर विविध रंगमंचावर कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर, युवारंग युवक महोत्सवाचे कार्याध्यक्ष दिलीप रामू पाटील, व्यवस्थापन परिषदेचे काही सदस्य, कुलसचिव बी.बी.पाटील, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिसभा सदस्य, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा.सत्यजित साळवे यांनी भेटी दिल्या. कलावंत विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडून करण्यात आलेल्या निवास, भोजन आणि रंगमंच व्यवस्थेबद्दल समाधान व्यक्त केले. रात्री उशिरा हर्षल पाटील यांचा ` नली ` हा एकल प्रयोग सादर झाला. हा रौप्य महोत्सवी प्रयोग होता.

### उद्या बक्षीस वितरण

उद्या शनिवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता दीक्षांत सभागृहात पारितोषिक वितरण समारंभ होणार असून सुप्रसिध्द अभिनेता व दिग्दर्शक योगेश कुलकर्णी यांच्या हस्ते पारितोषिके दिली जाणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील राहतील.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/16/हस्तदेय/2019 दिनांक : 15 फेब्रुवारी, 2019

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

( डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी